# बृहन्मुंबई महानगरपालिका
## मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष

### परिपत्रक

### क्र.प्रअभिअ/०७ दिनांक ०२.०६.२०१०

विषय: नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्तीपासून अभिलेखांचे संरक्षण करणेबाबत.

महाराष्ट्र शासन अभिलेख अधिनियम, २००५ नुसार अभिलेखांचे/पुराभिलेखांचे जतन करण्याकरीता नैसर्गिक तसेच मानवनिर्मित आपत्कालीन परिस्थितीमध्ये अभिलेखांचे संरक्षण करणेबाबत खाली नमूद केलेल्या उपाययोजना व प्रतिबंधात्मक उपाय यांचा वापर करावा.

१. पावसाळ्यात भिंती ओल्या होण्याची दाट शक्यता असते यामुळे अभिलेख ठेवलेली कपाटे ही भिंत, जमिन व छत यांपासून कमीत कमी १५ ते २० सें. मि. दूर ठेवण्यात यावेत.

२. अतिउष्णता, आर्द्रता व शुष्कता यापासून अभिलेखांचे संरक्षण करण्याकरीता अभिलेख कक्षात पुरेशी हवा खेळती राहील अशी व्यवस्था करावी.
उदा. वायुविजनाकरीता एक्झॉस्ट पंखे इत्यादी

३. पाण्याने भिजलेला अभिलेख उन्हात, अग्नीशेजारी न वाळविता शक्यतो सावलीमध्ये, पंख्याखाली वाळवावेत.

४. अभिलेख ठेवण्याच्या ज्या खोलीमध्ये पावसाचे पाणी भरण्याची शक्यता असेल तेथून अभिलेख त्वरित हलवून उंच जागी /दुसऱ्या खोलीत ठेवण्यात यावा.

५. पावसाळी कालावधीत अभिलेखास वाळवी, सिल्व्हर फिश, झुरळे, उंदीर यांचा प्रादुर्भाव होणार नाही याची दक्षता घ्यावी.

६. अभिलेख कक्षात किटकनाशक फवारणी व डांबर गोळ्या ठेवाव्यात.

७. अभिलेख कक्षाचे छत गळत असल्यास त्याचे त्वरीत डांबरीकरण करवून घ्यावे.

८. अभिलेख कक्षातील खिडक्यांची तावदाने फुटलेली असल्यास त्वरित दुरुस्ती करवून घ्यावीत.

९. गच्चीवर, पॅसेजमध्ये, बेसमेंटमध्ये ठेवलेला अभिलेख त्वरित या जागेवरुन हलविण्यात यावा.

उपरोक्त सूचनांचे सर्व खाते प्रमुख/सहाय्यक आयुक्त यांनी काटेकोरपणे व त्वरित पालन करण्यात यावे.

| | |
|---|---|
| **सही/-** | **सही/-** |
| **(२८.०५.२०१०)** | **(२९.०५.२०१०)** |
| **(ज्योतिष यो. देसाई)** | **(गो. प्र. राठोड)** |
| **प्रमुख अभिलेख अधिकारी** | **उप आयुक्त (म. भ. प्रा.)** |

**क्र. प्रअभिअ/०६ दि. ०२.१२.२००९**

---

प्रत .........................................................................................................

(------------ जादा प्रतींसह) यांना माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित.

**सही/-**
**तांत्रिक सहाय्यक**
**मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष**